महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२(२)(३)/२०२०/तेवीस दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२२.

**-: प्रसिद्धीपत्रक:-**

**विषय :-** महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा- २०२०
गुणांच्या फेर पडताळणीबाबत (Retotaling)करीता अर्ज सादर करण्याबाबत.

**संदर्भ :-** अधिसूचना क्रमांक २६०/२०२१.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा- २०२० पोलीस उपनिरीक्षक संवर्गाचा लेखी परीक्षेचा निकाल दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत निकालाद्वारे शारीरिक चाचणीसाठी अर्हताप्राप्त न ठरलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील "ONLINE FACILITIES" मधील "View Marksheet" या वेबलिंकद्वारे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच, गुणांची फेरपडताळणी (Retotaling) करू इच्छिणा-या उमेदवारांना फेर पडताळणीकरीता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील "ONLINE FACILITIES" मधील Retotaling of Marks या लिंकवर क्लिक करावे.

(२) उपलब्ध होणा-या परीक्षांच्या यादीमधून संबंधित परीक्षेची निवड करावी.

(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करून लॉगीन करावे.

(४) Retotaling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(५) उपलब्ध होणा-या गुणपत्रकातील फेरपडताळणी करावयाची असलेल्या विषयाची निवड करून Save बटनवर क्लिक करावे.

(६) निवड केलेल्या विषयानुसार सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

३. गुणांच्या फेरपडताळणी करीताची सदर वेबलिंक दिनांक ८ डिसेंबर, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरू राहील.

४. उपरोक्त कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेर पडताळणीकरीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्धवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा Support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

दिनांक: २९ नोव्हेंबर, २०२२
ठिकाण : मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग